# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट ३२३ - २३** **दिनांक : - १८/०९/२०२३**

## पुर्वी झालेल्या भांडणाचा मनात राग धरुन हत्या केलेल्या आरोपीस ०५ तासांचे आत जेरबंद करण्यात माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण पथकास यश

दिनांक १६/०९/२०२३ रोजी १५.०० वा. चे सुमारास अतिथी विश्रामगृह येथे राहत असलेला मयत सिंगर - राधाकृष्णन व्यंकट रामण, याने त्याची बॅग आरोपीत राजु नरेंद्र शहा याचे झोपण्याचे बंक बेड खाली ठेवल्याचे शुल्लक कारणावरुन वाद-विवाद झाला होता. तद्नंतर दिनांक १७/०९/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा.चे सुमारास यातील आरोपीत नामे राजु शहा हा त्याचे बंक बेडवर झोपलेला असतांना यातील मयत राधाकृष्ण व्यकंट रामण व मधुभाई अहिर हे आपसात बोलत असल्याने आरोपी याची झोपमोड झाल्याने आरोपीत व मयत यांच्यात भांडण झाल्याने त्याचा राग मनात धरुन आरोपीत राजु नरेंद्र शहा याने अतिथी विश्राम गृह, डोमेट्री लॉज, चौथा मजला, चंपा सदन बिल्डींग, येथील बाथरुम मध्ये मयत यास शिवीगाळी व ठोश्याबुक्क्याने मारहाण करुन भाजी कापण्याचे चाकुने छातीत भोकसुन त्यास जिवे ठार मारले म्हणुन अतिथी विश्राम गृह, डॉमेट्रीचे मॅनेजर नामे राजेंद्र हरिशंकर यादव, वय- ४७ वर्षे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन माणिकपुर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३६१/२०२३ कलम ३०२,३२३,५०४ भा.दं.वि. प्रमाणे दिनांक १७/०९/२०२३ रोजी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीचे आधारे सदर गुन्हयातील आरोपी नामे राजु नरेंद्र शहा, वय - ५५ वर्षे, रा. ग्राम - साबरकाटा, कलोड, जिल्हा - साबरकाटा, राज्य- गुजरात यास तो पळुण जाण्याचे तयारीत असतांना आनंद नगर, वसई पश्चिम परिसरातुन ताब्यात घेवुन ०५ तासांचे आत गुन्हा उघडकीस आणला आहे. त्याच्याकडे केलेल्या चौकशीमध्ये त्याने ०१ दिवसापुर्वी झालेल्या वादातुन रागाचे भरात भाजी कापण्याचे चाकुने छातीत उजव्या बाजुस भोकसुन खुन तपासात निष्पन्न झाले आहे.

सदर कारवाई श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - ०२, श्रीमती पद्मजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग व श्री. संपतराव पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. मिलिंद साबळे (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पो.उ.नि. सनिल पाटील, पो.ह. शैलेश पाटील, धनंजय चौधरी, शामेश चंदनशिवे, पो.शि. प्रविण कांदे, गोविंद लवटे, आनंदा गडदे यांनी केली आहे.

**----0000----**